पुढारी

# 'रवळनाथ'तर्फे ५ लाखांची शैक्षणिक कर्ज योजना

गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा



एम. एल. चौगुले

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टी-स्टेट) या संस्थेमार्फत भूमिहीन किंवा अल्पभूधारक सभासदांच्या मुला-मुलींसाठी पाच लाखांची शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध आहे. त्याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले.

भूमिहीन, अल्पभूधारक सभासदांच्या पाल्यांचा शैक्षणिक खर्चाची सोय व्हावी या उद्देशानेच ही कर्ज योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत सभासदांच्या पाल्यासाठी १० वर्ष मुदतीसाठी ही शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, प्रवेश शुल्क, प्रयोगशाळा शुल्क व वसतिगृह भाडे, भोजन खर्च, शैक्षणिक साहित्य खरेदी खर्च आदींचा समावेश आहे. सध्याच्या ५० लाखांच्या शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घेताना भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या पाल्यांना अडचणी येत असल्याने ही कर्ज योजना सुरू केली आहे. इच्छुक व पात्र सभासदांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, सीईओ डी. के. मायदेव उपस्थित होते.

## मुलींसाठी व्याजदरात सवलत

शैक्षणिक कर्ज योजनेत मुलांसाठी ९.५० टक्के, तर मुलींसाठी ९ टक्के व्याजदर आहे. ५० लाख मर्यादेच्या योजनेत व्याज दर महिन्याला भरावयाचा असून, ५ लाखांच्या योजनेत शिक्षणपूर्ण झाल्यानंतर मासिक हप्त्याने कर्जाची परतफेड करावयाची आहे.

My Kolhapur Edition
Aug 26, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in